OFFICE OF THE SUPDT. OF POLICE JALGAON
पोलीस अधीक्षक कार्यालय, जळगाव
Office Ph -0257-2220411 Fax - 0257-2220511
Email ID - sp.jalgaon@mahapolice.gov.in

प्रेस नोट :-

दिनांक १२/०८/२०२५

प्रति,

मा. संपादक,

---

**विषय:- स्थानिक गुन्हे शाखा, जळगांव यांनी फत्तेपुर पो.स्टे. येथील चोरीचा गुन्हा उघडकीस आणले बाबत.**

दिनांक ०४/०८/२०२५ रोजी फिर्यादी चेतन नंदकिशोर विसपुते वय २६ वर्ष धंदा- व्यापार (सोन्या चांदीचे दुकान) रा. कापडगल्ली, जामनेर जि. जळगांव यांनी फत्तेपुर पो.स्टे. ला फिर्याद दिली की, त्यांचे देउळगांव गुजरी ता. जामनेर येथील हरीओम अलंकार या सोन्याचे दुकानावर हजर असतांना दोन अनोळखी इसमांनी सोने खरेदी करण्याचे बहाण्याने फिर्यादीचे दुकानात येवुन फिर्यादीचे लक्ष विचलीत करुन त्यांचे दुकानातील ४०००००/- रु किंमतीचे सोन्याचे दागिने चोरुन नेले बाबत फिर्याद दिल्याने फत्तेपुर पो.स्टे. येथे सीसीटीएनएस गुरनं १४४/२०२५ बीएनएस कलम ३०५(अ),३(५) प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता.

मा.डॉ.श्री.महेश्वर रेड्डी सो.,पोलीस अधीक्षक,जळगाव, यांनी स्थानिक गुन्हे शाखा जळगांव यांना सदर गुन्हयाचा समांतर तपास करुन गुन्हा उघडकीस आणणे बाबत आदेशीत केल्याने श्री.संदीप पाटील, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा,जळगाव यांनी स्थानीक गुन्हे शाखेचे पोउपनि. पोउपनि. शरद बागल यांचे नेतृत्वात पथक तयार केले. नमुद पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी गुन्हयाच्या अनुशंगाने घटनास्थळाचा बारकाईने अभ्यास करुन, तांत्रिक विश्लेषण करुन सदर गुन्हयातील विधी संघर्षग्रस्त बालक यास निष्पन्न करुन त्यास ताब्यात गुन्हयाबाबत विचारपुस केली असता त्याने सदरचा गुन्हा हा त्याचे मध्य प्रदेश राज्यातील ईतर ०२ साथीदार यांचे सोबत केला असल्याची कबुली दिल्याने त्यास पुढीलन कार्यवाहीस्तव फत्तेपुर पोलीस स्टेशन यांचे ताब्यात दिले असुन त्याचे ०२ साथीदार यांचा शोध घेवुन पुढील तपास फत्तेपुर पोलीस स्टेशन करीत आहे.

सदरची कार्यवाही मा.डॉ.श्री.महेश्वर रेड्डी सो.,पोलीस अधीक्षक,जळगाव, मा.श्रीमती कविता नेरकर, अपर पोलीस अधीक्षक, चाळीसगाव तसेच मा.श्री. अरुण आव्हाड प्र. उपविभागीय पोलीस अधिकारी, पाचोरा भाग, तथा पोलीस उपअधीक्षक, (गृह) जळगांव यांच्या मार्गदर्शनाखाली श्री.संदीप पाटील, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा,जळगाव, पोउपनि.शरद बागल, श्रेणी पोउपनि. रविंद्र नरवाडे, पोहेकॉ/गोपाल गव्हाळे, उमाकांत पाटील, पोना/विकास सातदिवे, पोकॉ/प्रशांत परदेशी, राहुल वानखेडे, चालक पोकॉ/ महेश सोमवंशी सर्व स्थागुशा जळगांव यांच्या पथकाने केली आहे.

**जनसंपर्क अधिकारी,**
**जळगाव पोलीस**